# जिल्हाधिकारी कार्यालय, यवतमाळ

## दिनदयाल अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान अंतर्गत कंत्राटी तत्वारील रिक्त पदे भरणेबाबतची जाहीर सूचना

### जाहीरात क्रमांक/कलि/नपाप्र/कावि/५१५/२०१७, दि.२३/११/२०१७

शासन निर्णय नगर विकास क्र.एनयुएलएम-२०१७/प्र.क्र.१४४/नवि.२० दि. ३१ ऑक्टोबर २०१७ नुसार दिलेल्या निर्देशान्वये केंद्र शासन पुरस्कृत **दिनदयाल अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान (Nationonal Urban Livelihoods Mission)** अंतर्गत जिल्ह्यातील नगर परिषदामधील सहाय्यक प्रकल्प अधिकारी व समुदाय संघटकांची ठोक मानधनावरील **कंत्राटी तत्वावरील** रिक्त पदे भरणेबाबत इच्छुक व पात्र उमेदवाराकडून सदर जाहिरातीद्वारे **दिनांक ०७/१२/२०१७** पावेतो अर्ज मागविण्यात येत आहे.

**१. रिक्त पदांचा तपशिल :-**

| अ. क्र. | सहाय्यक प्रकल्प अधिकारी | समुदाय संघटक |
|---|---|---|
| १ | १ | २ |

**टिप : उपरोक्त दर्शविलेल्या पदसंख्येमध्ये वाढ किंवा घट होण्याची शक्यता असून याबाबतचे सर्व अधिकार जिल्हाधिकारी यांनी राखून ठेवले आहेत.**

**२. शैक्षणिक अर्हता, वयोमर्यादा व मासिक मानधन :-**

| अ. क्र. | पदाचे नाव | मासिक मानधन | शैक्षणिक अर्हता व अनुभव | वयोमर्यादा |
|---|---|---|---|---|
| १ | सहाय्यक प्रकल्प अधिकारी | ३०,०००/- प्रतिमाह | समाजशास्त्र विषयातील पदव्युत्तर पदवी (प्रथम श्रेणी) किंवा एम.एस.डब्लू. व कोणत्याही सामाजिक संस्थेतील कामाचा किमान ५ वर्षे अनुभव आवश्यक. संगणकामधील MS Office (Word, Excel, Power Point) याबाबतचे ज्ञान आवश्यक. दारिद्र्य रेषेखालील कुटुंबातील उमेदवारास सर्वोच्च प्राधान्य. | १८ ते ४५ वर्षे. सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजने अंतर्गत काम केलेल्या उमेदवारांसाठी ५ वर्षे शिथीलक्षम. |
| २ | समुदाय संघटक | १०,०००/- प्रतिमाह | किमान १२ वी पास. समाज विकास क्षेत्रामध्ये किमान ५ वर्षाचा अनूभव आवश्यक. संगणकामधील MS Office (Word, Excel, Power Point) याबाबतचे ज्ञान आवश्यक. विशेषत: शहरी दारिद्र्य रेषेखालील कुटुंबातील उमेदवारास सर्वोच्च प्राधान्य. | १८ ते ४५ वर्षे. सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजने अंतर्गत काम केलेल्या उमेदवारांसाठी ५ वर्षे शिथीलक्षम. |

टिप : **उमेदवाराची वयाची किमान व कमाल मर्यादा ही अर्ज करावायाच्या शेवटच्या दिनांकास म्हणजे दि.०७/१२/२०१७ रोजीच्या दिनांकास परिगणित करण्यात येईल.**

**३. अर्ज सादर करण्याबाबतच्या सूचना :-**

३.१ उमेदवारांना जाहिरातीमध्ये नमुद पदाकरिता विहीत केलेला अर्जाचा नमुना http://yavatmal.nic.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेला आहे. **अर्जात आवश्यक सर्व रकान्यात अचुक माहिती भरुन विहित ठिकाणी स्वत:चा अलीकडच्या काळातील फोटो चिकटवून तो साक्षांकित करावा तसेच शैक्षणिक अर्हता व इतर सर्व प्रमाणपत्रे साक्षांकित करुन अर्जासोबत सादर करावे. (साक्षांकन हे केंद्र/राज्य शासनाचे राजपत्रित अधिकारी किंवा सक्षम प्राधिकाऱ्याने केलेले असावे.)**